# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/विधि /कक्ष-१४/अधिवक्ता तालिका /२०१८ 12822 दिनांक : १०/०४/२०१८

प्रति,
मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र राज्य, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील मा.उच्च न्यायालय मुख्यपीठ मुंबई व खंडपीठ नागपूर तसेच सहकार न्यायालये व सहकारी अपील न्यायालय मुंबई व नागपूर पुढे प्राधिकरणातर्फे सहकारी संस्थांचे निवडणूक विषयक कामकाज करणा-या अधिका-यांची बाजू न्यायालयापुढे मांडणेसाठी वकीलास तालीकेवर घेणेबाबत जाहीर निवेदन शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना मा. उच्च न्यायालय मुख्यपीठ मुंबई व खंडपीठ नागपूर, तसेच मा. सहकार न्यायालय व सहकार अपिलेट न्यायालय नागपूर व मुंबई न्यायालयसाठी, निवडणूकां विषयक वादामध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे बाजू मांडण्यासाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी मा. उच्च न्यायालय मुख्यपीठ मुंबई साठी ३ व खंडपीठ नागपूर साठी २ अतिरीक्त अधिवक्ता व सहकार न्यायालये मुंबईसाठी ४ अधिवक्ते तसेच नागपूर सहकार न्यायालयासाठी १ त्याचप्रमाणे सहकार अपिलेट न्यायालय मुंबई व नागपूर साठी प्रत्येकी १, प्राधिकरणाची बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी पात्र व इच्छूक अधिवक्त्यांकडून प्राधिकरणाचे तालिकेवर नियुक्तीसाठी जाहीर निवेदनाव्दारे आवेदनपत्र मागविणेबाबतची जाहीरात महाराष्ट्र राज्यातील संबंधित मुंबई व नागपूर विभाग स्तरावर प्रादेशिक वृत्तपत्रामध्ये **दि.२०.०४.२०१८** रोजी फक्त एक वेळच्या मधल्या पान क्र. ३ व ४ मध्ये प्रसिध्द करावी.

उपरोक्त निवेदन कमीत कमी जागेत व शासकीय दराने प्रसिध्द करून देयके विहीत नमून्यात व आकारात प्राधिकृत पत्रासह उपलब्ध करून देण्यात यावी.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने**

१०।४।१८

**(यशवंत गिरी)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत —**

१) मा.अपर मुख्य सचिव(सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२
२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,नागपूर व मुंबई
४) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर / मुंबई-१ /मुंबई-२ / मुंबई-३ /मुंबई-४

अ.क्र. ३ व ४ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त जाहीर निवेदन त्यांनी मा. उच्च न्यायालय मुख्यपीठ मुंबई व खंडपीठ नागपूर यांचे वकील संघाचे तसेच सहकार न्यायालय व सहकार अपील न्यायालय मुंबई व नागपूर यांचे वकील संघाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावे.

५) लेखा शाखा